RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक १६३] सोमवार, नोव्हेंबर २७, २०१७/अग्रहायण ६, शके १९३९ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २४ नोव्हेंबर २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००.**

क्रमांक सीबीसी-१०/२०१७/प्र. क्र. ५०/मावक.—महाराष्ट्र शासन, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.२३) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून पुढील नियम करीत असून, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करीत आहे.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ मधील नियमात पुढील सुधारणा करण्यात येत आहे :—

**नियम क्र. ४.—सक्षम प्राधिकाऱ्याकडून जातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबतची कार्यपद्धती :—**

(घ) पडताळणी समितीने दिलेले, अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे उपलब्ध असल्यास वैधता प्रमाणपत्र;

सदरचे वैधता प्रमाणपत्र दाखल केले असल्यास, सदर वैधता प्रमाणपत्रास महत्त्वाचा पुरावा मानून, इतर पुराव्यांची मागणी न करता सक्षम प्राधिकाऱ्याने जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करावे.

**नियम क्र. ५ मधील उप नियम (६) मध्ये क्रमशः पुढीलप्रमाणे तरतूद जोडण्यात येत आहे :—**

जर अर्जदाराने पडताळणी समितीने निर्गमित केलेले अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यास, सक्षम प्राधिकाऱ्याने इतर कागदपत्राची किंवा पुराव्यांची मागणी न करता संबंधित अर्जदाराने सादर केलेले वैधता प्रमाणपत्र महत्त्वाचा पुरावा मानून जात प्रमाणपत्र निर्गमित करावे.

**नियम क्र. १६.— अर्जदाराकडून पुरविण्यात यावयाची माहिती :—**

(ज) उपलब्ध असल्यास, पडताळणी समितीच्या निर्णयाची साक्षांकित प्रत आणि/किंवा अर्जदाराच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र.

**स्पष्टीकरण :—**(१) केवळ वर उल्लेख केलेले दस्तऐवज सादर करणे याचा अर्थ, अर्जदाराची शाबितीच्या भारापासून मुक्तता झाली असा होणार नाही.

(२) पडताळणी समितीला आवश्यक वाटेल त्या त्या वेळी अर्जदार मूळ दस्तऐवज सादर करण्यास जबाबदार असेल.

(३) परंतु, संबंधित अर्जदाराने त्याच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांच्या जात वैधता प्रमाणपत्रासह संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचेकडे स्वतः करिता त्याच जातीच्या जात प्रमाणपत्रासह जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यास संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती संबंधित अर्जदाराचा त्याच्या रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्रासह अर्जदाराच्या जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज प्राप्त झाल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेचे संकेतस्थळ, संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयातील नोटीस बोर्ड यावर प्रसिद्ध करून सदर अर्जदाराच्या मागणीबाबत काही आक्षेप असल्यास सदर माहितीच्या प्रसिद्धीपासून १५ दिवसात संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे नोंदविण्याचे कळविण्यात येईल.

अर्जदाराच्या अर्जाबाबत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास त्यास जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी इतर पुराव्यांची मागणी न करता संबंधित अर्जदारास त्याने सादर केलेले रक्तसंबंधातील वडिलांचे किंवा सख्ख्या चुलत्याचे किंवा वडिलांकडील रक्तसंबंधातील इतर कोणत्याही नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्र महत्त्वाचा पुरावा मानून जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

अर्जदाराच्या अर्जाबाबत कोणताही आक्षेप उपस्थित झाल्यास संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विहित मार्गाने सदर आक्षेपांची चौकशी/तपासणी करील. सदर चौकशी/तपासणी कमाल ६० दिवसांच्या कालावधीत पूर्ण करेल व सदर आक्षेपात तथ्य आढळून न आल्यास तात्काळ संबंधित अर्जदारास जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करतील. तसेच सदर चौकशी/तपासणी अंती सदर आक्षेपात तथ्य आढळल्यास संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विहित कार्यालयीन पद्धतीचा अवलंब करून संबंधित अर्जदाराच्या जात वैधतेबाबतच्या दाव्या विषयी निर्णय घेतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिनेश वाघमारे,**

शासनाचे सचिव.

**SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 24th November 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SCHEDULE CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, OTHER BACKWARD CLASSES AND SPECIAL BACKWARD CATEGORY (REGULATION OF ISSUANCE AND VERIFICATION OF) CASTE CERTIFICATE ACT, 2000.

No. CBC-10/2017/CR50/B.C.W.—In exercise of the powers conferred by sub section (*1*) of section 18 of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000 (Mah. XXIII of 2001), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hearby makes the following rules, the same having been previously published as required by sub-section (*1*) of the said section 18, namely :—

Amendment in rules of Maharashtra Scheduled Castes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Rules, 2012 are as follows :—

Rule No. 4 :—Procedure for obtaining Caste Certificate from Competent Authority.—

(*d*) validity certificate, if any, of the father in blood relation or real uncle or any other relative of the applicant in blood relation from paternal side granted by the Scrutiny Committee ;

If such validity certificate has been submitted, competent authority will issue caste certificate without asking for other documents of proof by considering that validity certificate as an important evidence.

In Rule 5 of the principal rules, to sub-rule (6) the following proviso shall be added, namely :—

"Provided that, if validity certificate of the father in blood relation or real uncle or any other relative of the applicant in blood relation from paternal side granted by the Scrutiny Committee has been submitted by the applicant, the Competent Authority shall issue Caste Certificate without asking for any other documents or proof by considering that validity certificate as an important evidence"

Rule No. 16 :—Information to be supplied by applicant.—

(*h*) attested copy of decision of Scrutiny Committee and of Validity Certificate of applicant's father in blood relation or real uncle or any other relative of the applicant in blood relation from paternal side, if any.

*Explanation*.—(*1*) Mere production of above referred documents doesn't mean that applicant had discharged burden of proof.

(*2*) Applicant shall undertake production of original documents as and when required by the Scrutiny Committee.

(*3*) If an applicant submits the application alongwith the caste validity certificate of his father in blood relation or real uncle or any other blood relative from paternal side and if he has applied for the same caste of which above mentioned validity certificate is issued, in such case the name of such applicant alongwith the caste validity certificate of his father in blood relation or real uncle or any other blood relative from paternal side submitted by him will be displayed on the web site of Dr.Babasaheb Ambedkar Research And Training Institute, Pune (BARTI) as well it will be displayed on the notice board of the concerned District Caste Certificate Scrutiny Committee. It will be conveyed to register objection if any about the request of an applicant within 15 days from such publication.

If no objections or complaints are received with regard to such application then District Caste Certificate Scrutiny Committee will issue caste validity certificate without asking for other documents of proof by considering that validity certificate as an important evidence.

If any objections or complaints are received on the application, the District Caste Certificate Scrutiny Committee will make an enquiry within the maximum period of sixty days from the receipt of such complaints or objections.

If no substance is found the District Caste Certificate Scrutiny Committee will issue the validity certificate to the applicant. If any substance is found in objections or complaints the District Caste Certificate Scrutiny Committee will take decision about claim of the caste verification of concerned applicant by following prescribed office procedure and the decision about the caste validity will be taken.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DINESH WAGHMARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.